# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १८/०२/२००८

**लालबहाद्दुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,**
दि. १८/०२/२००८

आज सोमवार दि. १८/०२/२००८ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. १० दि. १३/०२/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहाद्दुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी **मा. सभापती, श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स** हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| ११) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १२) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १३) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १४) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| २) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, सर्व अधिकारी तथा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाल अशी आशा बाळगतो. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

या सुचनेव्दारे आपणांस कळविण्यांत येते की मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १८/२/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला लालबहादूर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १०, दि. १३/२/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण ५२, दि. १३/१२/२००७ व दि. १९/१२/२००७ चे इतिवृत्तांत कायम करणे. आमच्याकडून चुकून दि. १३/१२/२००७ चे इतिवृत्तांत डबल दिलेले आहे. फक्त १९/१२/२००७ चे इतिवृत्त आहे. दि. १३/१२/२००७ चे मागच्या वेळेस मंजूर झालेले आहे. दि. १९/१२/२००७ चे आहे ते मी पेजप्रमाणे घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, हा इतिवृत्तांताचा विषय नंतर घ्या मागचा विषय पहिला घ्या.

**नगरसचिव :-**

मिनिटस पहिले घ्यावे लागतात. तसे नियमातच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पान क्र. ३० वर श्री. खतगांवकर साहेब तुमचे म्हणणे आहे की, मा. आयुक्त साहेबांकडे जाहिरात विभाग आणि बांधकाम विभाग यांची संयुक्त बैठक होउन एकूण होर्डिंग्जला किती खर्च आला? त्याला आपण किती कालावधीसाठी राईटस दिलेले आहेत? आणि आपल्याला त्याच्यातून वार्षिक खर्च किती येतो आणि त्याचा ठेका कोणत्या कालावधीत संपुष्टात येणार आहे? आणि जे दिशादर्शक फलक लावायला पाहिजेत. त्यांच्या जागा कोणत्या आहेत? या सगळ्यांबाबत निर्णय घेउन येणाऱ्या सभेत माहिती देउ.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

हे सर्व श्री. पानपट्टे साहेबांनी केलेले आहे.

**मा. सभापती :-**

सर्व केलेले आहे. आत्ता आपल्याला मार्च महिन्यामध्ये निविदा काढायची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तो विषय वेगळा आहे. याची निविदा निघणार नाही. श्री. पानपट्टे साहेब, थोडेसे मिसगाईड करतात. याची निविदा निघणार नाही कारण याचा कालावधी अजून संपूष्टात आलेला नाही.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

सभेमध्ये विषय आणतो. त्याच्यावर तुम्ही निर्णय घ्या माहिती तयार केलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही हा विषय मा. महासभेमध्ये आणणार की स्टॅण्डींगमध्ये आणणार?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

स्टॅण्डींगमध्ये आणणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कधी आणणार आहात? साहेब दोन महिने होउन गेले. आठ सभा झाल्या. तुम्ही अजूनपर्यंत विषय आणलेला नाही. एका उपायुक्तांनी ऑर्डर दिलेली आहे. पण साहेब, तुम्ही अजूनपर्यंत विषय आणलेला नाही.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

मध्यंतरी पे ॲण्ड पार्कचा विषय, जाहिरातीचा सर्व्हे याच्यामध्ये वेळ गेलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पुढच्या वेळेस विषय आलाच पाहिजे. साहेब, तुम्ही रुलिंग द्या की, हा विषय पुढच्या मिटींगला आणा.

**मा. सभापती :-**

पुढच्या मिटींगला हा विषय आणा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इतिवृत्तांत सुचनांसह मंजूर असा मी ठराव मांडत आहे.

**टेरी परेरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५२ :-**

दि. १९/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४० :-**

दि. १९/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. टेरी परेरा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५३, पुर्नविनियोजन करणेबाबत. आरोग्य साफसफाई विभाग.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब हे जे आरोग्य विभागाचे पुर्नविनियोजन आहे. सध्या आपल्याकडे फंडस अव्हेलेबल नाही. तर आपल्याला महानगरपालिकेने जे सुधारित मूळ अंदाजपत्रक देणार आहेत. तर आपण याचे पुर्नविनियोजन त्याच्यामध्ये करु या असा मी ठराव मांडत आहे.

**टेरी परेरा :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे पैसे उपलब्ध नसल्या कारणाने सदरचा विषय सुधारित अंदाजपत्रकामध्ये घ्यावा.

**प्रकरण क्र. ५३ :-**

पुर्नविनियोजन करणेबाबत. (आरोग्य साफसफाई विभाग)

**ठराव क्र. ४१ :-**

आरोग्य विभागाने सादर केलेले पुर्नविनियोजन खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | नोव्हेंबर अखेर पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजित खर्च (मार्च २००८) पर्यंत | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नविन फायर फायटर खरेदी करणे. | ५,२५,००,०००/- | - | १,६९,२१,९०९/- | ३,५५,७८,०९१/- |
| २ | संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान | १६,००,०००/- | २,१७,१००/- | ८२,९००/- | १३,००,०००/- |
| ३ | सक्शन मशिन | २०,००,०००/- | ७,९६,८१२/- | ९,१३,३५०/- | |
| ४ | कर्मचारी, गणवेश | ८,००,०००/- | - | ५०,०००/- | |
| ५ | कत्तलखाने | २५,००,०००/- | - | १,००,०००/- | |
| ६ | औषधे खरेदी | १,२०,००,०००/- | १४,४६,९७५/- | ९५,५३,०२५/- | १०,००,०००/- |

| लेखाशिर्ष | मुळ तरतुद | नोव्हेंबर अखेर पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजित खर्च (मार्च २००८) पर्यंत | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|
| **७** | **८** | **९** | **१०** | **११** |
| वॉर्ड साफसफाई | १५,००,००,०००/- | १४,३६,०१,६८९/- | ४,१०,७६,४०२/- | ३,४६,७८,०९१/- |
| डंपर, जे.सी.बी., पोकलन दुरूस्ती व निगा | १८,००,०००/- | १६,०७,६१४/- | १०,९२,३८६/- | ९,००,०००/- |
| एकात्मिक डास नियंत्रण | १,६४,००,०००/- | १,४१,९९,८३८/- | ७९,४०,०००/- | ५७,३९,८३८/- |

वर तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र. ०१ हे नविन फायर फायटर खरेदी करणे मधुन वॉर्ड साफसफाई व डंपर, जे.सी.बी. पोकलन दुरूस्ती व निगा या लेखाशिर्षा करिता उपारोक्त शिल्लक रू. ३,५५,७९,०९१/- हि बाब मा. महासभेच्या मंजुरीकरीता शिफारस करण्यात येत आहे. तसेच अ.क्र. ०२ ते ०६ या लेखाशिर्षाखाली केलेल्या पुर्नविनियोजनास सुधारीत अंदाजपत्रक सन २००७-०८ यामध्ये सुधारणा करणेस मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अ.क्र. ०१ चा समावेश सुधारीत अंदाजपत्रकात करून मा. महासभेपुढे ठेवण्यात शिफारस करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील        अनुमोदक :- श्री. टेरी परेरा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४ सन २००७-२००८ चे सुधारित व २००८-०९ चे मूळ अंदाजपत्रक सादर करणेबाबत. सदरचे अंदाजपत्रक मा. आयुक्त सादर करणार आहेत. तसेच, पुढील प्रकरण क्र. ५५, परिवहन उपक्रमाचे सन २००७-०८ चे सुधारित व २००८-०९ चे मूळ अंदाजपत्रक सादर करणे. सदर अंदाजपत्रक सादर करण्यासाठी मा. परिवहन समिती सभापती दालनात येत आहेत. मा. परिवहन

समितीचे सभापती श्री. शांताराम ठाकूर मा. स्थायी समिती सभापती व सर्व सदस्यांना परिवहन समितीचे २००७-०८ चे सुधारित व २००८-०९ चे मूळ अंदाजपत्रक सादर करीत आहेत. सर्वांनी उभे राहायचे आहे.

(मा. परिवहन समिती सभापती श्री. शांताराम ठाकूर ह्यांनी परिवहन उपक्रमाचे सन २००७-०८ चे सुधारित व २००८-०९ चे मूळ अंदाजपत्रक सादर केले.)

**नगरसचिव :-**

मा. परिवहन समिती सभापतींनी मा. स्थायी समिती सभापती ह्यांना बजेट सादर केलेले आहे. मा. सभापतींनी ते बजेट स्विकारलेले आहे. मा. परिवहन समिती सभापती बजेटवर आपले निवेदन करीत आहे.

**शांताराम ठाकूर (मा. परिहवन समिती सभापती) :-**

पहिल्यांदा सर्वांचे आभार मानतो. मी जो बजेट सादर केला त्याला आपण सर्वांनी सहकार्य केले. मा. स्थायी समिती सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स साहेब व सन्मा. स्थायी समिती सदस्य, सदस्या, मा. आयुक्त साहेब आणि आमचे व्यवस्थापक साहेब. तसेच अधिकारी वर्ग मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९७ अन्वये मा. परिवहन व्यवस्थापक यांनी सादर केलेले अंदाजपत्रक आवश्यक त्या दुरुस्त्या करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९८(३) नुसार आपल्याकडे मंजूरीसाठी सादर करताना अतिशय आनंद होत आहे. सध्या आपल्या परिवहनच्या ताफ्यामध्ये ४५ बसेस खाजगीकरणामार्फत शहरातील १७ मार्गावर सुरु असून त्यामध्ये दररोज ५०,००० प्रवासी प्रवास करत असतात. त्यामध्ये नव्याने पाच बसगाड्या नागरिकांच्या सेवेकरिता ठेकेदारांकडून उपलब्ध होणार आहेत. तसेच, या अंदाजपत्रकात भूसंपादन व आगार बांधकाम इत्यादीकरिता तरतुद करण्यांत आलेली आहे. या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची भाडेवाढ सुचविण्यात आलेली नाही. यामुळे प्रवाशांवर जादा बोझा न पडता इतर मार्गाने उत्पन्न कसे मिळवता येईल यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत. मा. सदस्य, परिवहन व्यवस्थापक व अधिकारी वर्ग यांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात ही तुट भरुन निघणार आहे. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच परिवहन उपक्रमाकडे स्वतःच्या गाड्या नसल्याने बोरिवली व ठाणे इथे आर.टी.ओ. ने आपल्याला परवानगी नाकारलेली आहे आणि म्हणून आपल्याला स्वतःचे फिल्ड असणे फार गरजेचे आहे आपण परिवहनच्या माध्यमातून विद्यार्थी व प्रवासी पास सुविधा चालू केलेली आहे. स्वातंत्र्यसैनिकांना आपण मोफत प्रवास करण्याची परवानगी दिलेली आहे. माझी आपल्याला एकच विनंती आहे. मिरा रोड येथे पार्किंग आरक्षणाचा एक भूखंड आहे. मी मा. स्थायी समिती अध्यक्षांना तसे पत्र दिलेले आहे. मा. आयुक्त साहेबांना पत्र दिलेले आहे. तो भुखंड एका खाजगी ठेकेदाराला दिलेला आहे. आणि त्याच्यातून चाळीस ते पन्नास हजार रुपये उत्पन्न महानगरपालिकेला मिळत असते. माझी सर्व सन्मा. सदस्यांना नम्र विनंती आहे की, ती पार्किंगची जागा जर आपल्या परिवहनासाठी दिली तर आपल्या परिवहनमध्ये निश्चित फायदा होईल. याचे कारण असे की तिथले प्रवासी रेल्वेतून उतरल्यानंतर ते प्रवासी पायी पाच मिनिटे चालत बसस्टॅण्डं पर्यंत येतात. तोपर्यंत रिक्षावाले ते प्रवासी उचलून घेउन जातात. हा आपल्या उत्पन्नाचा त्याच्यातून फायदा आहे. म्हणून माझी मा. आयुक्त साहेबांनासुद्धा विनंती आहे की, मी आपल्याला जे पत्र दिलेले आहे तर या भुखंडाबाबत पार्किंग आरक्षणाचा निश्चित विचार करावा. आणि ती जागा आपण परिवहन सेवेसाठी ठेवावी अशी आपणांस नम्र विनंती आहे.

**प्रशांत पालांडे :-**

त्याचा सर्व्हे नंबर काय आहे?

**शांताराम ठाकूर :-**

१८४ आहे. महानगरपालिकेने ज्यावेळेस मी सभापती झालो त्यावेळेस सुचवले होते की आपली बससेवा फक्त शहरामध्ये चालते. आणि त्यामध्ये जास्त उत्पन्न वाढत नाही आणि म्हणून मी आपल्याला नम्र विनंती करतो की, महानगरपालिकेने आम्हांला पेट्रोल पंपासाठी जागा दिली तर परिवहनच्या माध्यमातून आपण पेट्रोल पंप सुरु करुन आपण सवलतीच्या दराने आपल्या शहरवासिंयाना, आपल्या बसेसना इंधन देउ शकतो. तसेच प्रशासकीय खर्च कमी असल्याने यावर्षी खर्चात वाढ कमी झालेली आहे. परिवहन सेवा सुरु होण्यासाठी आपलेकडील जे मोलाचे सहकार्य मिळाले. तेच सहकार्य यापुढेही परिवहन सेवा सुरळीत सुरु राहण्यासाठी आपणाकडून मिळावे हीच अपेक्षा. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे हे जे बजेट आहे. हे शिल्लकीचे आहे की, तोट्याचे?

**शांताराम ठाकूर :-**

शिल्लकीचे.

**मिलन म्हात्रे :-**

कितीचे आहे? एकूण बजेट किती आणि शिल्लकीचे किती ते सांगा.

**शांताराम ठाकूर :-**

एक लाख शिल्लकीचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब तुमच्या भाषणात पहिले ते बजेटचे आकडे आले पाहिजे की हे इतक्याचे बजेट ठेवले आहे. इतक्याचे शिल्लकीचे आणि तोट्याचे आहे. हे एक्स्प्लनेशन तुम्ही दिले पाहिजे. भाषणामध्ये पहिली लाईन ती पाहिजे. धंदा काय झाला? आपण लॉसमध्ये आहोत, की डुबलो आहोत, का फायद्यात आहोत?

**विजय पाटील (सहा. आयुक्त, परिवहन) :-**

२००८-०९ चे अंदाजपत्रक मा. सभापती साहेबांनी आत्ताच स्टॅण्डींग कमिटीसमोर सादर केलेले आहे. परिवहन उपक्रमाची २००८-०९ ची जमा बाजू सोळा कोटी शहात्तर लाख आहे आणि खर्च सोळा कोटी पंच्याहत्तर लाख रुपये आहे. एक लाखाचे शिल्लकी अंदाजपत्रक आम्ही सर्व मा. सदस्यांना सादर केलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

त्याच्यामध्ये महापालिकेकडून घेतलेल्या लोनचे दिले आहे का?

**विजय पाटील :-**

दोन कोटी पन्नास लाखाचे अनुदान मिळावे असे...

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४, सन २००७-०८ चे सुधारित व २००८-०९ चे मूळ अंदाजपत्रक सादर करणे. प्रकरण क्र. ५६, वृक्ष प्राधिकरणाचे सन २००७-०८ चे सुधारित व २००८-०९ चे मूळ अंदाजपत्रक सादर करणे. मा. आयुक्त दोन्ही बजेट मा. सभापतींना सादर करत आहेत.

(मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. डी. शिंदे ह्यांनी सन २००७-०८ चे सुधारित व २००८-०९ चे मूळ अंदाजपत्रक तसेच वृक्ष प्राधिकरणाचे सन २००७-०८ चे सुधारित व २००८-०९ चे मूळ अंदाजपत्रक सादर केले.)

**नगरसचिव :-**

मा. आयुक्त साहेब, सभागृहात बजेटवर निवेदन करत आहेत.

**आर. डी. शिंदे (मा. प्रभारी आयुक्त सो.) :-**

सन्मा. स्थायी समिती सभापती श्री. मॉरस रॅाड्रीक्स साहेब या स्थायी समितीचे सचिव श्री. हरेश पाटील साहेब, सर्व सन्मा. सदस्य आणि माझे सर्व सहकारी, उपस्थित अधिकारी व कर्मचारी मुंबई प्रांतिक महानगरपालिका "अ" व "क" सन २००७-०८ चा सुधारित व सन २००८-०९ चा मूळ अर्थसंकल्प सादर करताना मला आनंद होत आहे. मिरा भाईंदर शहर हे मुंबई महानगरपालिकेच्या समीप असल्याने शहराची झपाट्याने दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाढत्या लोकसंख्येला नागरी सेवा पुरविणे क्रमप्राप्त आहे. याशिवाय औद्योगिकरण व शहर सुंदरीकरण याचादेखील विचार करणे आवश्यक आहे. नागरी सुविधा योजनांची अंमलबजावणी विहित कालावधीत करणेसाठी शहर विकास प्रकल्प राज्य शासनाकडून मंजूरी प्राप्त होउन केंद्र शासनाला सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये भुयारी गटारे योजना, भुयारी मार्ग, एकात्मिक नाला प्रकल्प यांस प्राधान्य क्रम देण्यात आलेला आहे. सदरच्या महत्वाकांक्षी योजना राबविण्यासाठी केंद्र शासनातर्फे ३५ टक्के, राज्य शासनातर्फे १५ टक्के अनुदान व महापालिकेचा हिस्सा ५०टक्के असा आर्थिक निकष आहे. शहरातील नागरिकांना देण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावणे व पुढील पंधरा वर्षातील संभाव्य नागरी सुविधाबाबतच्या अडचणी विचारात घेवून केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहाय्याने जवाहरलाल नेहरू नागरी पुर्नस्थान योजनेअंतर्गत विकासकामे हाती घेण्यांत आलेली आहेत. यासाठी महापालिकेला स्वतःचा हिस्सा खर्च करावा लागणार आहे. सध्याच्या महसूली उत्पन्नामधून या प्रकल्पासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नसल्याने चालू कामे पूर्ण करणेसाठी व आवश्यकतेनुसार नवी कामे घ्यावयाची झाल्यास मालमत्ता कर दर, जकात कर यामध्ये वाढ करण्याशिवाय गत्यंतर नाही. या करवाढीमुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात, जकातीपोटी हा आकडा आहे, ९.५० कोटी वाढ होणार असून सदरच्या वाढीव उत्पन्नाचा विनियोग प्रस्तावित प्रकल्पाच्या खर्चासाठी व कर्ज परतफेडीसाठी करण्यांत येणार आहे. आता जकात कराची जी वाढ सुचविलेली आहे. तर त्याच्या संबंधामध्ये या खालच्या दोन लाईन

आम्ही मुद्दाम स्पेसिफाय केलेल्या आहेत. शासनाचे जकात कर बंद करण्याचे धोरण कदाचित पुढच्या आर्थिक वर्षात कधीही अंमलात येउ शकेल. त्या दृष्टीने आपला बेस हा वाढला पाहिजे. कारण आपल्याला जे शेवटचे अनुदान प्राप्त होणार आहे. त्याच्यावर आपले पुढचे अनुदान निश्चित होणार आहे. त्यामुळे इतर महापालिकांचा विचार केला असता आपल्या महापालिकेमध्ये ज्या बाबींवर आपण कमी जकात आकारतो तर त्याच्या संदर्भातील अभ्यास करुन जो कमीत कमी दर आहे आणि जो मॅक्झीमम दर आहे. तर त्याच्या मध्ये जिथे २टक्के असेल तिथे ३टक्के जिथे मॅक्झीमम चार्ज करता येणे शक्य आहे तिथे ४ टक्के अशाप्रकारे आम्ही वाढ सुचविलेली आहे. ज्यावेळी प्रत्यक्ष चर्चा होईल तेव्हा त्याच्यामध्ये कमी जास्त करणे मा. स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांनी ठरविण्याची बाब आहे. महापालिकेने सुचविलेली जकात कर दरातील वाढ, त्यातही परत कंपनी पेड ऑक्ट्रॉय ज्या ज्या आयटमवर आहे. ती मागच्या वेळेला देखील मी आयुक्त असताना हा विषय सभागृहापुढे आणलेला होता की, कंपनी पेड ऑक्ट्रॉयमध्ये अशी कल्पना आहे की, ऑक्ट्रॉयची रक्कम ही संबंधित उत्पादक कंपनी देते. तर त्याच्यावर आपण मॅक्झीमम ऑक्ट्रॉय आकारला. तर त्याच्यामुळे आपल्याकडे प्रत्यक्षात लोड पडत नाही आणि आज आपण ऑक्ट्रॉय कमी घेतला म्हणून देखील ग्राहकांना सवलतीच्या दरामध्ये कुठली वस्तू उपलब्ध होते अशीही परिस्थिती नाही तर त्यामुळे कंपनी ज्या वस्तूंवर ऑक्ट्रॉय देते ती आम्ही याच्यासाठी निवडलेली आहे. त्याची सर्व सुची आपल्याला चर्चेच्यावेळी देण्यांत येईल. अर्थसंकल्पातील ज्या ठळक बाबी आहे. त्या मी आपल्या निदर्शनाला आणतो. मालमत्ता करापोटी ४१.५० कोटी, जकात करापोटी ९०.१४ कोटी, पाण्यावरील कर ३०.८२ विशेष शिक्षण कर १ कोटी ४८ लक्ष, विकास कर १२ कोटी, बाजार फी २ कोटी ३३ लक्ष, नविन नळ जोडणी ४ कोटी, अग्निशमन सेवा कर १ कोटी ४८ लक्ष, वृक्षकर १ कोटी ९० लक्ष आत्ता हा डि.पी.रोड भुयारी मार्ग वगैरे हा जो मुद्दा आहे. त्याच्यामध्ये जे.एन.आर.यू.एम. ची जी मागच्या बाजूला आकडेवारी दिलेली आहे. त्याच्यापोटी खरं तर ११५ कोटीचा तो आकडा आहे. खर्चाच्या ज्या ठळक बाबी आहेत. त्याच्यामध्ये नविन रस्ते आणि डी.पी.रोड याच्यापोटी ४ कोटी रुपये, स्टेडीअम, क्रिडा संकूल, बगीचे, मैदाने ३ कोटी रुपये, रुग्णालय, दवाखाने १ कोटी २० लाख रुपये, घनकचरा व्यवस्थापन १ कोटी २० लाख प्रभाग कार्यालय इमारत बांधकाम १५ लक्ष, हॉस्पिटल जागा संपादन, बांधकाम १ कोटी ७५ लक्ष, नगर भूसंपादन १ कोटी ३२ लक्ष, संगणक २ कोटी ४० लक्ष, नविन फायर फायटर खरेदी २ कोटी ५० लक्ष वृक्षप्राधिकरण ३ कोटी २५ लक्ष, परिवहन सेवेला अनुदान १ कोटी ७७ लक्ष, पाणी पुरवठा व मलनिःसारणासाठी अनुदान ५ कोटी ६५ लक्ष आणि जे.एन.एन.यू.आर.एम. साठी राखीव निधी ९ कोटी ५० लक्ष तो कर्जापोटी आहे. पण जे.एन.एन.यू.आर.एम. साठी जी टोटल प्रोव्हीजन आहे. ही पाठीमागच्या पानावर दर्शविण्यांत आलेली आहे. याच्यामध्ये १२० कोटी रुपयांचे काम या पुढच्या आर्थिक वर्षामध्ये आपल्याला अपेक्षित आहे. ज्यामध्ये भुयारी गटारं योजना आहे. आणि या ज्या दुसऱ्या दोन योजना आहेत त्या कदाचित लवकरच त्याही मान्य होतील. त्या साधारण १० कोटीच्या आहेत. याच्यामध्ये केंद्र सरकारचे अनुदान ३५टक्के प्रमाणे आपल्याला ४२ कोटी मिळेल. राज्य शासनाचे अनुदान १५टक्के आहे, ते १८ कोटी १४ लक्ष इतके मिळेल आणि महापालिकेने स्वतःच्या हिस्सामधून ६० कोटी ४५ लक्ष द्यायचे आहेत. तर महसूली उत्पन्नातून ३४ कोटी ४६ लक्ष देण्याचा प्रस्ताव केलेला आहे आणि एम.एम.आर.डी.ए. चे कर्ज हे २६ कोटी रुपये, असा हा ६० कोटीचा आपण जो हिस्सा त्याच्यात टाकायचा आहे. तर त्याचा तो हिशोब आहे. खर्चाच्या बाबीमध्ये भुयारी गटारावर ११० कोटी खर्च दाखवलेला आहे. भुयारी मार्ग आणि कल्व्हर्ट याच्यावर ७ कोटी ४८ लक्ष आणि एकात्मिक नाला प्रकल्प याच्यावर ३ कोटी रुपये या आर्थिक वर्षातील खर्च असे १२० कोटी रुपयांचे हे उत्पन्न आणि हा खर्च असे दर्शविण्यांत आलेले आहे. शहर नियोजन हे शहराच्या विकासाला गती देणारे असणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शहराच्या विकासाच्या वाट्यात सर्वांना संधी मिळणे हे अत्यंत महत्वाचे आहे. ही बाब केंद्रीभूत मानून जे.एन.एन.आर.यू.एम. मधील योजनांची अंमलबजावणी या अर्थसंकल्पात व नियोजनात करण्यांत आलेली आहे. या अर्थसंकल्पातील योजना तडीस नेताना सर्व घटकांचे सहकार्य लाभेल अशी आशा व्यक्त करुन हा अर्थसंकल्पीय आराखडा मा. स्थायी समितीस मी सादर करत आहे. याच्यातील शेवटचे पान मी आपल्या निदर्शनाला आणू इच्छितो. ज्याच्यामध्ये संपूर्ण अंदाजपत्रकाची जी लिस्ट आहे, ती दर्शविण्यांत आलेली आहे. हे जे शेवटचे पेज आहे त्याच्यामध्ये ढोबळ मानाने आपला जो आराखडा आहे. त्याच्या संदर्भातील उत्पन्न आणि खर्चाचे विवरण दिलेले आहे. "अ" अंदाजपत्रकापोटी ३१३ कोटी ५२ लक्ष इतके उत्पन्न मिळण्याचा अंदाज व्यक्त केलेला आहे. "ब" अंदाजपत्रकामध्ये १४.२५ इतके उत्पन्न मिळण्याची अपेक्षा ठेवलेली आहे. "क" अंदाजपत्रकामध्ये ४३.२६ इतके उत्पन्न अपेक्षित आहे. आणि वृक्षप्राधिकरण २.५ खर्चामध्ये "अ" अंदाजपत्रकामध्ये ३०४ कोटी ८५ लक्ष खर्च दाखवलेला आहे.

“ब” अंदाजपत्रकामध्ये १६ कोटी १ लक्ष, “क” अंदाजपत्रकामध्ये ४८ लक्ष, वृक्षप्राधिकरणामध्ये ३ कोटी २५ लक्ष, अखेरची शिल्लक ५ लक्ष असा ३७३ कोटी ८ लक्ष हा उत्पन्न आणि खर्च दर्शविण्यांत आला आहे. “ब” अंदाजपत्रकाला आपण सबसिडीतून “अ” अंदाजपत्रकातून अमाउंट वर्ग करण्यांत आलेली आहे. ती साधारण १.७७ आणि “क” अंदाजपत्रकासाठी ५.६५, वृक्षप्राधिकरणसाठी १.२५ असे “अ” अंदाजपत्रकाच्या उत्पन्नातून वर्ग केलेली रक्कम आहे. अशा प्रकारे “ब” अंदाजपत्रकात जी तुट भरुन निघालेली आहे किंवा “क” अंदाजपत्रकात ती तुट आपण “अ” मधून वर्ग करुन भरुन काढलेली आहे. तर असा हा ३७३ कोटी ८ लक्ष ९३ हजार, इतक्या उत्पन्नाचा आणि ५ लाख ९० हजाराची शिल्लक ठेवून असा हा अर्थसंकल्प मी आपल्याकडे सादर केलेला आहे. कृपया त्यावर योग्य ती चर्चा व्हावी आणि त्याला मान्यता मिळावी अशी मी सन्मा. स्थायी समितीला विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

या अर्थसंकल्पामध्ये आपण सुरुवातीलाच ५.९० ची आपण जमेची दिली आहे. म्हणजे आपल्याला मी सगळी रक्कम सरते शेवटी गंगाजळी काहीच नाही असे निष्पण्ण होत नाही का? म्हणजे आपण ते अंदाज आत्ताच दर्शविणे चुकीचे आहे की, आमच्या गंगाजळी पाच लाखच राहतील. ते जास्तीत जास्त का राहू नये?

**आर. डी. शिंदे (मा. प्रभारी आयुक्त सो.) :-**

अखेरची शिल्लक दाखविण्याची एक तरतुद असते. आपले जेवढे उत्पन्न आहे, आपल्याकडे असे म्हटले गेले की, अंथरुण पाहून पाय पसरावे, तर आपल्या उत्पन्नावर आपण दाखवले आहे. आणि त्या प्रमाणामध्ये आपण काय काय योजना सुरु करतो ते आपण खालचा मुद्दा दाखवला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जर अगोदरच आपला इष्टांक ठेवला, जसा बँकांचा इष्टांक असतो की, वर्षाला आमचे हे टारगेट, सेल्स एजन्सी असतात त्यांना टारगेट दिले जाते की तुम्ही एवढे करायचे आत्ता आपण त्याला टारगेट ठेवले की, पाच लाखच शिल्लक राहणार आहेत, तर आपण पुढे जावूच शकत नाही. आपली शिल्लक जास्त का असू नये? मी हे बोलतो. आजचा मा. स्थायी समितीचा सदस्य या नात्याने माझी एवढीच हरकत आहे की, आपण ९.९० का वर्क केले? आपण ते जास्त का दिले नाही? आपण अपेक्षा करायची. आमचा धंदा फायद्यात होईल.

**आर. डी. शिंदे (मा. प्रभारी आयुक्त सो.) :-**

साधारण आपण उत्पन्नाचा जो अंदाज घेतो. त्या प्रमाणामध्ये आपण खर्च करावा अशी अपेक्षा असते. आपण जास्त शिल्लक...

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या वर्षीचेसुद्धा तेच झाले. म्हणजे माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की, आपण गेल्यावर्षीचीच री या वेळेला ओढली आहे. आपण पुढे प्रोग्रेस केलेला नाही. हे मी सांगतो. भाव वाढले. आपण नवीन बी.ओ.टी. वर दिले. आपण पुढे देउ. म्हणजे तुम्ही म्हणता...

**आर. डी. शिंदे (मा. प्रभारी आयुक्त सो.) :-**

आपण ज्यावेळी चर्चा कराल आणि सजेशन कराल त्यावेळी त्याच्यात बदल होउ शकतात.

**मिलन म्हात्रे :-**

मागचे पण असेच झाले. बरोबर पाच लाखाचा फिगर निघाला.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, आपण आता जे बजेट सादर केलेले आहे. आता आम्ही पहिल्यांदाच बजेटवर स्टॅण्डींगमध्ये आहोत. चर्चा साधारणपणे कशी होते? म्हणजे खातेनिहाय होते की पूर्ण ओव्हर ऑल...

**आर. डी. शिंदे (मा. प्रभारी आयुक्त सो.) :-**

खातेनिहाय होते.

**प्रशांत पालांडे :-**

आजपासून सुरु होणार की नंतर? कारण आम्हांला बघायला वेळ मिळाला पाहिजे.

**मा. सभापती :-**

मी सर्व सभासदांना विनंती करतो की आपण २५ पासून बैठक सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुम्ही २३ पासून सुरु करा.

**मा. सभापती :-**

२३ ला सुट्टी आहे. मी २१ पासून ठेवतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुम्ही २१-२२ ला घ्या. तुम्ही २१ ला जर दोन डिपार्टमेंट बोलवणार असाल तर तीन किंवा चार बोलवा.

**मा. सभापती :-**

२५, २६, २७, २८, २९ ला आपण पूर्ण करु.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही २१ ला घ्या.

**मा. सभापती :-**

२५ पासून सहा दिवस होतात. २५ पासून पूर्ण हफ्ता राहील. २५ ते २९.

**मिलन म्हात्रे :-**

मग २६ ला घ्या.

**मा. सभापती :-**

२६ ते २९ ला पूर्ण करु. सकाळी ११ वाजता मिटींग सुरु करण्यांत येईल. २६, २७, २८, २९ ला पूर्ण २९ ला फायनल.

**नगरसचिव :-**

मा. सभापतींनी दिलेल्या तारखेप्रमाणे २६, २७, २८,२९ या कालावधीचा प्रोग्राम आपल्याला स्वतंत्रपणे कळविण्यांत येईल आणि २९ ला अंतिम राहील. सर्व सदस्यांनी याची नोंद घ्यायची आहे.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य/सदस्या, सर्व अधिकारी/कर्मचारी वर्ग, आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२ वा. १५ मि.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**